# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः31.05.2025** **वारःशनिवार**

---

•राष्ट्रीय फ्लोरेन्स नाइटिंगेल पुरस्कारांचं राष्ट्रपतींच्या हस्ते वितरण; जळगावच्या सुजाता बागूल यांचाही सन्मान

•पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३००व्या जयंतीनिमित्त आज राज्यात विविध कार्यक्रम

• पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची धोरणं आजही लागू – मुख्यमंत्री फडणवीस यांचे गौरवोद्गार आणि

•राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनीचं प्रशिक्षण पूर्ण करत महिलांच्या पहिल्या तुकडीचं दिमाखदार दीक्षांत संचलन

**राष्ट्रपती पुरस्कार**

आरोग्य क्षेत्रात निस्वार्थ वृत्तीनं सेवा देणाऱ्या देशभरातीलं 15 परिचारकांना काल राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते राष्ट्रीय फ्लोरेन्स नाइटिंगेल पुरस्कारानं गौरवण्यात आलं.

जळगाव जिल्ह्यातल्या कठोरा मधल्या प्राथमिक आरोग्य केंद्रात कार्यरत असलेल्या सहायक परिचारिका सुजाता बागुल यांनाही राष्ट्रीय फ्लोरेन्स नाइटिंगेल पुरस्कारानं सन्मानित करण्यात आलं. आरोग्य क्षेत्रात गेली 18 वर्षे अत्यंत निष्ठा, कष्ट आणि समर्पित भावनेनं सेवा बजावणाऱ्या सुजाता बागुल यांनी राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रमांची प्रभावी अंमलबजावणी करत उल्लेखनीय कामगिरी केली आहे.

**अहिल्यादेवी**

लोकमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या तीनशेव्या जयंतीच्या निमित्तानं अहिल्यानगर जिल्ह्यातील चौंडी या त्यांच्या जन्मगावी मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री तसंच विधान परिषदेचे सभापती यांच्या उपस्थितीत आज एका विशेष कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं आहे. यानिमित्तानं चौंडी मध्ये विविध विकास कामांचा शुभारंभ केला जाणार आहे. अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीनिमित्तानं संपूर्ण राज्यभरात आज अनेक कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे.

**<u>मुख्यमंत्री पुणे</u>**

पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांचं जन्मगाव असलेल्या चौंडी गावाच्या विकासाचा आराखडा तयार केला असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल पुण्यात सांगितलं.

अहिल्याबाई होळकर यांच्या नावानं महिलांच्या विकासाच्या अनेक योजनांची मुहूर्तमेढ रोवली असून या माध्यमातून सक्षम अहिल्या घडवण्याचा निर्धार फडणवीस यांनी व्यक्त केला. अहिल्यादेवी होळकर यांच्या तीनशेव्या जयंती निमित्त भारतीय जनता युवा मोर्चाच्यावतीनं युवा प्रेरणा संवाद या कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं होतं; त्यावेळी ते बोलत होते. मंत्री चंद्रकांत पाटील यांच्यासह अन्य मान्यवर यावेळी उपस्थित होते. या कार्यक्रमात युवा मोर्चातील महिला कार्यकर्त्यांचा सत्कार करण्यात आला.

तीनशे वर्षे उलटूनही पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचा राज्यकारभार, लोक व्यवहार, प्रशासन व्यवस्था याची आठवण काढली जाते, अहिल्यादेवींनी राबवलेली धोरणं आजही लागू होतात असं ते म्हणाले,

**<u>Byte – मुख्यमंत्री</u>**

**<u>Nda</u>**

राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनीच्या १४८ व्या तुकडीचा दीक्षांत संचलन सोहळा काल पुण्यात पार पडला. Nda च्या ७५ वर्षांच्या इतिहासात काल पहिल्यांदा १७ मुलींची तुकडी प्रशिक्षण संपवून भारतीय सैन्यात अधिकारी पदावर रुजू होण्यासाठी सज्ज झाली. ऐकुया या बाबतचा अधिक वृत्तांत आमच्या प्रतिनिधी कडून..

**<u>व्हीसी</u>**

***राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनीच्या इतिहासात ३० मे २०२५ हा दिवस मैलाचा दगड ठरला कारण प्रबोधिनीमध्ये प्रशिक्षण घेतलेली पहिली महिलांची तुकडी भारतीय सैन्य दलात दाखल झाली. सर्वोच्च न्यायालयाने २०२१ मध्ये दिलेल्या ऐतिहासिक निर्णयानंतर राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनीची दार महिलांसाठी खुली झाली. त्यानंतर ऑगस्ट २०२२ मध्ये प्रवेश परीक्षा देऊन महिला छात्रांची तुकडी संरक्षण प्रबोधिनीत दाखल झाली आणि प्रबोधिनीच्या त्याचबरोबर भारतीय सैन्य दलाच्या परिवर्तनाला सुरुवात झाली. सुरुवातीला त्यांच्यासाठी स्वतंत्र निवासाची आणि प्रशिक्षणाची व्यवस्था होती. परंतु आता पुरुष छात्रांच्या बरोबरीने महिला छत्रांचही प्रशिक्षण सुरू झालं आहे. त्यांचाही समावेश आता प्रबोधिनीत उपलब्ध असलेल्या स्कॉर्डर्न्स मध्ये करण्यात आला आहे. तीन वर्षांच्या सैन्य दलासाठी आवश्यक खडतर शारीरिक आणि शैक्षणिक प्रशिक्षणानंतर पहिली तुकडी सैन्य दलात दाखल झाली.***

**<u>कृषी अभियान</u>**

केंद्रीय कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्रालयाच्या विकसित कृषी संकल्प अभियान या देशव्यापी अभियाना अंतर्गत पालघर जिल्ह्यात कोसबाड कृषी विज्ञान केंद्रात शेतकऱ्यांसाठी मार्गदर्शनपर कार्यक्रम आयोजित करण्यात आला. यावेळी विविध विषयातील शास्त्रज्ञांनी उपस्थित शेतकऱ्यांना प्रात्यक्षिकाच्या माध्यमातून शेतीविषयक मार्गदर्शन केलं.

गावोगावी जावून शेतकऱ्यांना खरीप हंगामाच्या अनुषंगानं मार्गदर्शन करणं, प्रयोगशील शेतकऱ्यांच्या शेतावर भेटी देणं, शासकीय योजना शेतकऱ्यांपर्यंत पोहचवणे, आधुनिक कृषी तंत्रज्ञाना विषयी जागरूकता मोहीम राबवणं हा या अभियाना मागचा उद्देश आहे.

**<u>इंट्रो</u>**

**<u>कृषी</u>**

अचानक येणारी नैसर्गिक आपत्ती, नवनवीन रोग, किडीचा प्रादुर्भाव, पाण्याचं दुर्भिक्ष, वेळेत तज्ज्ञांचा न मिळणारा सल्ला, अशा बाबींमुळे शेतकऱ्यांसमोरील अडचणी वाढत आहेत. त्यामुळे राज्यात दररोज सरासरी सहा ते सात शेतकरी आत्महत्या होत आहेत. या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांचा पैसा, श्रम आणि वेळेची बचत व्हावी म्हणून पुढील महिन्यापासून शेती क्षेत्रात कृत्रिम बुद्धीमत्ता म्हणजे एआयचा वापर केला जाणार आहे. ऐकुया अधिक वृत्तांत

**<u>Vc</u>**

***राज्यातील शेतकऱ्यांना आता प्रत्येक बाबींवर अचूक सल्ला मिळणार आहे. शेतकऱ्यांना वेळेत मार्गदर्शन, सल्ला मिळाल्यास त्यांचे नुकसान कमी होईल. तसेच श्रम, वेळ व पैसा बचत होईल, या उद्देशाने राज्य सरकारने आता शेतीत कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करण्याचा निर्णय घेतला. त्यातून शेतकऱ्यांना माती परीक्षणापासून पिकांची लागवड ते पीक निघून बाजारपेठेत नेईपर्यंतची माहिती दिली जाणार आहे. त्यासाठी जिल्हा ते सर्कल स्तरापर्यंतचा शेतकऱ्यांचा डेटा कृषी विभागाने संकलित केला आहे. ई-पीक पहाणीवरून पिकांची क्षेत्रनिहाय माहिती देखील कृषी विभागाकडे असणार आहे. रोग, किडीच्या नियंत्रणासाठी कोणती औषधे फवारायची, कोणत्या पिकांना कोणत्यावेळी किती पाणी द्यायचे, हवामान बदलाची माहिती देऊन त्यावेळी काय खबरदारी घ्यायची, यावर माहिती मिळणार आहे. शेतकरी त्यांच्या बोलीभाषेतून प्रश्न विचारू शकणार आहे. असे पुणे कृषी विभागाचे उपसंचालक गिरीश कुलकर्णी यांनी सांगितले.***

**<u>गडकरी ‘बायोचार’</u>**

शेतकऱ्यांना आर्थिक दृष्ट्या सक्षम आणि समृद्ध करण्यासाठी तसंच शेतीचं उत्पादन वाढवण्यासाठी ‘बायोचार’चा वापर करण्याचं आवाहन काल केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी शेतकऱ्यांना केलं. ॲग्रोव्हिजन फाउंडेशनच्या वतीनं नागपूरच्या धापेवाडा इथल्या भक्ती फार्मस् इथं आयोजित बायोचार निर्मिती प्रात्यक्षिक आणि प्रशिक्षण कार्यशाळेत ते बोलत होते. बायोचार हा पिकांचं अवशेष जाळून तयार केलेला कोळशासारखा पदार्थ आहे. आपल्याकडे उपलब्ध पऱ्हाटी आणि तुऱ्हाटी हा बायोचार तयार करण्यासाठी उत्तम बायोमास आहे. नवीन तंत्र, नवीन प्रयोग करून शेतकऱ्यांना उत्पादकता वाढवावी लागेल, शेतात वापरायच्या छोट्या उपकरणांची बँक तयार करणं गरजेचं आहे, काळाच्या ओघात शेतकऱ्यांनाच आपल्या विकासाचा मार्ग शोधावा लागेल, असंही गडकरी यावेळी म्हणाले.

**<u>पेरणी सल्ला</u>**

गेल्या आठवड्याभरात राज्यात बहुतांश जिल्ह्यांमध्ये मोठा पाऊस झाला. मे महिन्यात अशा स्वरूपाचा पाऊस यापूर्वी झालेला नाही. आता उघडीप मिळाल्यानंतर शेतात वापसा येण्यास मदत होईल. त्यासाठी किमान पाच सहा दिवस लागतील. वापसा आल्यानंतर पेरणीला सुरुवात करता येईल, असं कृषी संचालक विनयकुमार आवटे यांनी म्हटलं आहे. कोकणातील शेतकऱ्यांना आता भात रोपे टाकण्यासाठी ही उत्तम वेळ आहे. अतिवृष्टी झालेल्या विदर्भ मराठवाडा आणि उत्तर महाराष्ट्रातील शेतकऱ्यांनी वापसा आल्यानंतर बीज प्रक्रिया करूनच पेरणी करावी. पावसाचं प्रमाण कमी असलेल्या ठिकाणी शेतकऱ्यांनी जमिनीतील ओलाव्याचा अंदाज घेऊन पेरणी करण्याचा सल्ला आवटे यांनी दिला आहे.

**<u>पुस्तक प्रकाशन</u>**

‘खजिन्याची शोधयात्रा’ या पुस्तकाच्या माध्यमातून प्रशांत पोळ यांनी महाराष्ट्राची संस्कृती जतन करण्याचं काम केलं असल्याचं प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल पुण्यात केलं. प्रशांत पोळ लिखित ‘खजिन्याची शोधयात्रा’ या पुस्तकाचं प्रकाशन फडणवीस यांच्या हस्ते झालं, त्यावेळी ते बोलत होते.

**<u>आयपीएलक्रिके</u>**ट

आयपीएल क्रिकेटमध्ये काल झालेल्या सामन्यात मुंबई इंडियन्स संघानं गुजरात टायटन्सचा वीस धावांनी पराभव केला. मुंबईनं प्रथम फलंदाजी करताना 228 धावा केल्या, प्रत्युत्तरादाखल गुजरात टायटन्स 208 धावा करू शकला. क्वालिफायर टू मध्ये आता पंजाब किंग्स विरुद्ध मुंबई इंडियन्स यांचा सामना उद्या अहमदाबाद इथं होणार आहे. या दोन्ही संघातील विजेता 3 जून रोजी अंतिम सामना रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूविरुद्ध खेळेल.

**<u>हवामान</u>**

मध्य महाराष्ट्रात पावसाने काहीशी विश्रांती घेतली असली तरी गेल्या चोवीस तासात कोकण, विदर्भ आणि मराठवाड्यात काही ठिकाणी जोरदार पाऊस पडला. आज दिवसभरात ही तुरळक ठिकाणी जोरदार पावसाची शक्यता हवामान विभागानं वर्तवलेली आहे.

**याबरोबरच आकाशवाणी पुणे केंद्रावरच प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.**